# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:11.04.2026** **वारः शनिवार**

1. निरोगी, समृद्ध आणि विकसित भारतासाठी प्रत्येकाचं योगदान आवश्यक असल्याचं, केंद्रीय मंत्री मनसुख मांडवीय यांचं प्रतिपादन.
2. भाडेतत्त्वावरील परवडणाऱ्या घरांसाठी सक्षम यंत्रणा कार्यान्वित करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश
3. महिला आणि बाल विकास विभागात साडे आठ हजारांहून अधिक नियमित पदभरतीला मान्यता आणि
4. थोर समाजसुधारक महात्मा ज्योतीराव फुले यांच्या 200व्या जयंतीनिमित्त आज राज्यभरात विविध कार्यक्रम

**मांडवीय**

'निरोगी भारत, समृद्ध भारत आणि विकसित भारत' ही संकल्पना पूर्ण करण्यासाठी वैद्यकीय व्यवसायींसह प्रत्येकाचं योगदान आवश्यक आहे; असं प्रतिपादन केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडविय यांनी केलं आहे. ते काल पुण्यात 'जन सेहत सेतू' शिबीराचं उद्घाटन केल्यानंतर बोलत होते. यावेळी एका पोर्टलचं लोकार्पणही करण्यात आलं. निरोगी भारत घडवण्यासाठी, महिन्यातून एक दिवस मोफत आरोग्य तपासणी आणि उपचार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानं 'जन सेहत सेतू' आरोग्य शिबीर आयोजित केलं जात आहे. यात वैद्यकीय व्यवसायी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवावा, असं आवाहन मांडवीय यांनी केलं. नागरिकांना दर्जेदार वैद्यकीय सेवा पुरविण्याला शासनाचे प्राधान्य राहणार असल्याचं प्रतिपादन राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर यांनी यावेळी केलं. सर्वोत्तम मनुष्यबळ ही राष्ट्राची शक्ती असून शिबीरांबाबत जनजागृती करण्याचं आवाहन पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांनी यावेळी केलं.

**पीएमआवास**

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत परवडणारी घरे बांधण्यासाठी बोरिवली येथील भारत संचार निगम लिमिटेड आणि महानगर टेलिफोन निगम यांच्या मालकीची आरक्षित जागा रेडीरेकनर दरानुसार घेण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळाची बैठक काल मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झाली त्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या जागेवर सुमारे एक हजाराहून अधिक घरे बांधण्याचा प्रस्ताव आहे. दरम्यान महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या 2026-27 च्या अर्थसंकल्पात 'म्हाडा'च्या मुंबई, पुणे, कोकण, नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर या प्रादेशिक मंडळांमार्फत एकंदर 13 हजार 12 सदनिकांचे बांधकाम करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी 10 हजार 585 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**भाडेघर**

मुंबईमध्ये नोकरी, व्यवसाय निमित्ताने येणाऱ्या नागरिकांसाठी भाडेतत्त्वावरील परवडणाऱ्या घरांसाठी सक्षम यंत्रणा सुरु करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. तसेच भाडेतत्त्वावरील परवडणाऱ्या घरांसाठी नागरिकांच्या सुविधांकरिता पोर्टल विकसित करण्याच्या सूचनाही फडणवीस यांनी काल एका बैठकीत दिल्या. भाडे दरा

संदर्भातील न्यायालयीन प्रकरणे निकाली काढण्यासाठी 100 विशेष न्यायालये स्थापन करावी. यासाठी सेवानिवृत्त न्यायाधीशांची नियुक्ती करावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

**<u>पदभरती</u>**

महिला आणि बाल विकास विभागात 8 हजार 669 नियमित पदांची भरती करण्यात येणार असल्याची माहिती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. या निर्णयामुळे विभागाच्या सक्षमीकरणाला मोठी चालना मिळणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. विभागाच्या कामकाजासाठी 2 हजार 843 पदे बाह्ययंत्रणे मार्फत भरण्यासाठीही मान्यता देण्यात आली आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत 1 लाख 10 हजार 664 अंगणवाडी सेविका आणि 1 लाख 10 हजार 664 अंगणवाडी मदतनीस, अशी एकंदर 2 लाख 21 हजार 328 पदांना देखील मंजुरी देण्यात आली आहे.

**<u>कॉस्ट ऑडिट</u>**

विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करताना कार्यक्षम, पारदर्शक आणि स्पर्धात्मक अर्थव्यवस्था उभारण्यासाठी कॉस्ट ऑडिटची भूमिका महत्त्वाची असल्याचं प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केलं आहे. इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडियातर्फे आयोजित 'कॉस्ट ऑडिट फॉर विकसित भारत' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन करताना राज्यपाल काल बोलत होते.

**<u>महात्मा फुले जयंती</u>**

थोर समाज सुधारक, विचारवंत क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले यांच्या 200व्या जयंती वर्षाला आजपासून सुरुवात होत आहे. 11 एप्रिल 1827 रोजी जन्म झालेल्या महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षण आणि सामाजिक प्रबोधनाचं कार्य केलं. त्यांच्या जयंती निमित्त आज राज्यभरात विविध ठिकाणी त्यांना अभिवादन केलं जात आहे.

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या 200 व्या जयंतीनिमित्त या संपूर्ण वर्षभरात राज्यात अनेक कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागामार्फत 11 एप्रिल 2026 ते 10 एप्रिल 2027 या कालावधीत राज्यातील सर्व शाळांमध्ये विविध शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबवले जाणार असल्याचं शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितलं.

पुण्यातील भिडे वाड्यात, तसंच अन्य विविध ठिकाणी आज अभिवादन कार्यक्रम होणार आहेत. परभणी जिल्ह्यातील कौसडी इथल्या जिल्हा परिषद शाळेत काल रात्री 10 हजार 135 दिवे प्रज्वलित करून क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आलं. विविध रंगांच्या फुलांचा वापर करून महात्मा ज्योतिराव फुले यांची भव्य प्रतिमाही यावेळी साकारण्यात आली होती. ज्येष्ठ लेखक, दिग्दर्शक, अभिनेते अतुल पेठे, महात्मा फुले यांना अभिवादन करताना म्हणतात.....

**ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले महाराष्ट्रात घडले, म्हणून आपण आज सगळेजण इतक्या अभिमानानं इथे राहतोत, जगतो आणि विवेकपूर्ण वागतो याची नम्र अशी जाणीव मला आहे. ज्योतिराव आणि सावित्रीबाईंचं काम किती मोठं आहे हे अनेकांनी आत्तापर्यंत सांगून ठेवलंय. पण एक नाटकवाला म्हणून मला असं वाटतं, तृतीय रत्न नावाचं जे नाटक ज्योतिराव फुल्यांनी लिहिलं होतं ते अत्यंत महत्वाचं आहे. त्याच्यामधलं जे राजकारण आहे त्यातली जी भाषा आहे त्यातला जो विचार वूह आहे हा अत्यंत महत्वाचा आहे.ज्योतिरावांनी अनेक पातळ्यांवर कामं केली ती म्हणजे लोकांना जागृत करणं, लोकांना विवेकशील बनवणं, लोकांना अभ्यासाचा मार्ग दाखवणं, लोकांना वाचनाचा मार्ग दाखवणं आणि आपणच आपणच स्वतः काम करून विचार करून, अभ्यास**

**करून विज्ञानाचा मार्ग चोकाळून आपलं जीवन पालटवू शकतो याचा एक दृष्टांत या दाम्पत्याने दिलेला आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्मृतीला मी नमन करतो.**

**मुंडे**

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगारक्षम केलं जाणार आहे, ही योजना ग्रामीण पशुपालकांच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाचे एक सशक्त माध्यम ठरेल असा विश्वास पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी काल पुण्यात व्यक्त केला. 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' सादरीकरण आणि अमंलबजावणी कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुदंडा, यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. पशुधन उद्योजकता योजनेच्या माध्यमातून ग्रामीण युवकांना पशुपालनाकडे केवळ पारंपारिक व्यवसाय म्हणून न पाहता एक व्यावसायिक उद्योजकता म्हणून पाहण्यास प्रोत्साहन दिले जात असल्याचं मुंडे म्हणाल्या.

**कासव महोत्सव-सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात वेंगुर्ला-वायंगणी बीच इथं नुकतंच 'कासव महोत्सवा'च आयोजन करण्यात आल होत. यावेळी आमदार दीपक केसरकर आणि जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शेकडो कासवाच्या पिल्लांना समुद्रात सोडण्यात आल. यावेळी आरवली येथील वाळूशिल्पकार रविराज चिपकर यांनी साकारलेल्या आकर्षक कासव वाळुशिल्पाचे फित कापुन अनावरण करण्यात आले. तसेच कासव संवर्धनामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या कासव मित्रांचा सन्मान करण्यात आला.

**स्वॅम्प पोलिस- रत्नागिरी**

दलदलीच्या भागांमध्ये गस्त घालण्यासाठी 'स्वॅम्प पोलिस' हा देशातला पहिला उपक्रम रत्नागिरीत सुरू झाला आहे. प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात येणार असलेल्या या उपक्रमाचं पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते रत्नागिरी तालुक्यातल्या नारायणमळी इथे काल उद्घाटन झालं. रत्नागिरी जिल्ह्यात समुद्रकिनाऱ्यांसह अनेक खाडीकिनारे, घनदाट कांदळवनं आणि दलदलीचे संवेदनशील प्रदेश आहेत. अशा चिखलाच्या, दुर्गम भागांमध्ये पारंपरिक नौका किंवा वाहनांद्वारे गस्त घालणं पोलिसांसाठी आव्हानात्मक ठरत होतं; म्हणून आता जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांच्या संकल्पनेतल्या 'स्वॅम्प पोलीस' उपक्रमांतर्गत त्या भागात कयाक बोटींद्वारे गस्त घातली जाणार आहे.

**माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव**

जिल्हा तसच गाव पातळीवर विकास कामांबरोबरच नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न करण्यासाठी 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियान राबविण्यात येत आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी पूर्ण क्षमतेने झोकून देऊन काम करण्याचं आवाहन सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केलं आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' विभागीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

**हवामान**

येत्या दोन दिवसात कोकणात उष्ण आणि दमट हवामा राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. इतरत्र हवामान कोरडं राहिल.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.